# निशाणी क्र. ८० खालील आदेश

१. **प्रतिवादी क्र. १ यांचे कथन असे आहे की,** वादी यांनी दाव्या दरम्यान दिनांक २०/०९/२०२२ व दिनांक १९/०७/२०२५ रोजी दावा दुरुस्तीचे अर्ज दाखल केले व सदरील अर्ज हे मंजुर होवून वादी यांनी दिनांक ०५/०२/२०२४ व दिनांक ०५/०८/२०२५ रोजी दुरुस्त दावे दाखल केलेले आहेत.

२. **प्रतिवादी क्र. १ यांचे कथन असे आहे की,** वादी यांनी दाव्यात दुरुस्ती करुन मुळ दावा घोषणेचा असताना वादी यांनी दुरुस्ती करुन वाटप मागितलेले आहे. वादी यांनी वादी क्र. १ चे सासरे व दीर यांना प्रतिवादी क्र. ७ व ८ यांना समाविष्ट करुन तोंडी वाटपाबाबतच्या स्मरणपत्राचा मजकुर दुरुस्त दाव्यात वाढवण्यात आलेला आहे. वादी यांनी दावा दुरुस्त करुन वाटपाची मागणी केल्याने वादी यांच्या कुटूंबाच्या सर्व मिळकतीचे कागदपत्रे प्रतिवादी क्र. १ यांना मुदतीत मिळाली नाहीत. प्रतिवादी क्र. १ यांनी दरम्यानच्या काळात त्यांचे विधीज्ञ दाव्याच्या कामकाजकामी बदलल्यामुळे प्रतिवादी क्र. १ हे मुदतीत दोन्ही दुरुस्त दाव्याची लेखी कैफियत दाखल करु शकले नाहीत. वादीचा दावा हा स्थावर मिळकतीबाबतचा असुन प्रतिवादी क्र. १ हे खरेदीदार आहेत, त्यामुळे, प्रतिवादी क्र. १ यांना त्यांचा बचाव करण्याची पूर्ण संधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र. १ यांना दुरुस्त लेखी कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे गरजेचे आहे. सबब, प्रतिवादी क्र. १ विरुध्द झालेला विना दुरुस्त लेखी कैफियत हा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. १ यांना दुरुस्त लेखी कैफियत दाखल करण्याची परवानगी द्यावी.

३. **सदर अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. ८१ वर असे दिले की,** अर्जातील पॅरा क्र. २ मधील मजकुर वादीने दाव्या दरम्यान दिनांक २०/०२/२०२२ व दिनांक २५/०७/२०२२ रोजी दावा दुरुस्तीचे अर्ज दाखल केले हे खरे आहे, तसेच ते अर्ज दरम्यानी घटनेसंबंधीचे असल्याने मे. कोर्टाने मंजुर केले असुन, त्या अर्जास प्रतिवादी क्र. १ ने म्हणणेही दिले होते. तसेच, अर्जातील पॅरा क्र. ३ मधील मजकुर खोटा आहे व निरर्थक आहे. **प्रतिवादी यांना कागदपत्रे कोणती हवी होती व ती कधी मिळाली, याचा कसलाही खुलासा अर्जामध्ये दिलेला नाही. कागदपत्रे मिळाली नाहीत हे विना लेखी कैफियतचा आदेश रद्द होण्यास कारण होऊ शकत नाही.** प्रतिवादी क्र. १ हे खरेदीदार नसुन, त्याने मयत आनंद शिंदे यांची फसवणुक करुन खोटे दस्त बनवले आहेत. विधवा वादी नं. १ हिस त्रास दिल्यास व प्रकरणात अडचणी आणल्यास वादी प्रकरण सोडुन देतील म्हणुन अशा प्रकरणचे खोटे अर्ज दाखल करीत आहे. “Defendant No. 1 and 2 not filed additional W.S. within stipulated period, hence suit proceeded without W.S. against defendant No. 1 and 2” असा आदेश दिनांक ०२/०९/२०२५ रोजी मे. कोर्टाने केला आहे, त्यानंतर वादीने दिनांक ०७/११/२०२५ रोजी तिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र मे. कोर्टात दाखल केले असुन त्यानंतर ७ महिन्यांनी प्रतिवादी क्र. १ ने अशा प्रकारचा खोटा अर्ज दाखल केला आहे. सबब, अर्ज नामंजुर करावा.

४. सदर अर्जाकामी माझे विचारार्थ पुढील मुद्दे निघतात, त्याचे निष्कर्ष कारणासहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी क्र. १ यांचा प्रस्तुतचा निशाणी क्र. ८० चा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ व २ करीताः—**

५. अर्ज वाचला. म्हणणे पाहिले. दोन्ही विधीज्ञांनी युक्तिवाद केला.

६. **प्रतिवादी क्र. १ यांचे कथन असे आहे की,** वादी यांनी दाव्यात दुरुस्ती करुन मुळ दावा घोषणेचा असताना वादी यांनी दुरुस्ती करुन वाटप मागितलेले आहे. वादी यांनी वादी क्र. १ चे सासरे व दीर यांना प्रतिवादी क्र. ७ व ८ यांना समाविष्ट करुन तोंडी वाटपाबाबतच्या स्मरणपत्राचा मजकुर दुरुस्त दाव्यात वाढवण्यात आलेला आहे. वादी यांनी दावा दुरुस्त करुन वाटपाची मागणी केल्याने वादी यांच्या कुटूंबाच्या सर्व मिळकतीचे कागदपत्रे प्रतिवादी क्र. १ यांना मुदतीत मिळाली नाहीत. **याउलट, वादीचे कथन असे आहे की,** अर्जातील पॅरा क्र. २ मधील मजकुर वादीने दाव्या दरम्यान दिनांक २०/०२/२०२२ व दिनांक २५/०७/२०२२ रोजी दावा दुरुस्तीचे अर्ज दाखल केले हे खरे आहे. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना यातील वादीने मुळ दाव्यात दुरुस्ती केली आहे हे वादीला मान्य आहे, त्यामुळे वादीने केलेल्या दुरुस्तीस प्रतिवादी क्र. १ याची दुरुस्ती कैफियत रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जात नमुद केलेल्या कारणास्तव प्रतिवादी क्र. १ च्या विरुध्द विना दुरुस्त कैफियतचा आदेश रद्द करणे न्यायोचित वाटते. सबब, मी **मुद्दा क्र. १** चे उत्तर **होकारार्थी** देतो व **मुद्दा क्र. २** करीता खालील आदेश पारीत करतो.

# <u>आदेश</u>

१. प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ यांचा **निशाणी क्र. ८०** चा अर्ज **मंजुर** करण्यात येतो.

२. प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ यांना दुरुस्त कैफियत देण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो व त्यांचेविरुध्द झालेला विना दुरुस्त कैफियतीचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ यांनी खर्चापोटी रक्कम **रुपये १०००/- (एक हजार रुपये)** वादीस द्यावी व त्यानंतर दुरुस्त कैफियत रेकॉर्डवर घेण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DEEPAK MADHUKAR GIRI
Date: 2026.06.24 15:25:33 +0530

**दिनांकः- २४.०६.२०२६**

**(डी. एम. गिरी)**
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, परंडा.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Rehan J Kazi<br>Stenographer (Grade-II) |
| Court | - | Jt. Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 24-06-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 24-06-2026 |
| Order uploaded on | - | 24-06-2026 |